**"मे २०१७" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

## (अ) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक ६ मे २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये विभागीय चौकशी प्रलंबित असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना पदोन्नती देताना करावयाच्या कार्यवाहीबाबत विहित करण्यात आलेल्या सुधारित कार्यपद्धतीबाबत सूचना / सुधारणा सुचविण्या-करिता दिनांक ३१ मे २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ६ मे २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांतर्गत कार्यालयीन संगणक साहित्य खरेदीसाठी सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) करिता खरेदी समिती गठित करण्यात आली आहे.
- दिनांक ३ मे २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीसाठी विहित केलेली प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% ची मर्यादा दिनांक १ मार्च २०१७ पासून पुढे दोन वर्षे (दिनांक २८ फेब्रुवारी २०१९ पर्यंत) चालू ठेवण्यात आली आहे.
- दिनांक ९ मे २०१७ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या ८ अस्थायी पदांना दिनांक ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ८ मे २०१७ च्या शासन ज्ञापनान्वये लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१५ च्या प्रतिक्षायादीवरील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ३०२ उमेदवारांचे बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील सदर पदावर नियतवाटप करण्यात आले आहे. तर दिनांक १२ मे २०१७ च्या शासन शुद्धीपत्रान्वये काही उमेदवारांचा शिफारस क्रमांक, गुणवत्ता क्रमांक व आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग यात सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक २३ मे २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना (मंत्रालयीन विभाग वाटप), आंतरविभागीय बदल्या याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करण्यासाठी नागरी सेवा मंडळ-३ ची फेररचना करण्यात आली आहे.
- दिनांक १८ मे २०१७ च्या शासन निर्णयान्वये आस्थापना मंडळ क्रमांक-२ ची पुनर्रचना करण्यात आली आहे.
- दिनांक १५ मे २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली (HRMS) ही ई-प्रशासन प्रणाली तयार करण्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी गठित केलेल्या कोअर समितीस दिनांक ३० एप्रिल २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक २६ मे २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनामार्फत चालविण्यात येत असलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय उपाहारगृह, चौरस आहारगृह, विधानभवन उपाहारगृह व कोकणभवन उपाहारगृहातील विक्रीसाठी ठेवण्यात येणारे खाद्यपदार्थ, भोजनथाळी व पेय पदार्थ इत्यादींच्या विक्री दरात दिनांक १ जून २०१७ पासून वाढ करण्यात आली आहे.
- दिनांक २३ मे २०१७ च्या अधिसूचनेन्वये "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप (सुधारणा) नियम २०१७" प्रसिद्ध करण्यात आला आहे. महसूली वाटप २०१५ च्या नियमातील नियम-६(अ) नंतर परंतुकान्वये सुधारणा करण्यात आली आहे.

## (ब) प्रशिक्षण

- दिनांक २२ मे २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील सहायक कक्ष अधिकारी यांचे सन २०१७ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण वर्ग दिनांक ५ जून २०१७ पासून परिषद सभागृह, सहावा मजला, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे.

## (क) पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची

- दिनांक २ मे २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये श्री.र.मा.बांधे यांचा उच्चश्रेणी लघुलेखकांच्या दिनांक १ जानेवारी २०१७ च्या अंतिम ज्येष्ठतासूचीत ज्येष्ठताक्रम निश्चित करण्यात आला आहे.
- दिनांक २ मे २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये दिनांक १ जानेवारी रोजीच्या सन २००७ ते २०१० या कालावधीतील अनुक्रमे वर्षनिहाय ५२७, ६०८, ७०३, ७१४ (एकूण २५५२) कक्ष अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- दिनांक १७ मे २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये श्री.स.दि.खरात, अवर सचिव यांचा दिनांक १ ऑगस्ट २०१६ हा सदर पदावरील पदोन्नतीचा दिनांक रद्द करण्यात आल्याने, त्यांचे नांव दिनांक १ जानेवारी २००७ ते १ जानेवारी २०११ या कालावधीतील संबंधित वर्षांच्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूचीतून वगळण्यात आले आहे.
- दिनांक १५ मे २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र सहायकांची सामायिक ज्येष्ठतासूचीत बदल करण्यात आले आहेत.
- दिनांक २४ मे २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये दिनांक १ जानेवारी रोजीच्या सन २०११ ते २०१५ या कालावधीतील अनुक्रमे वर्षनिहाय ७२४, ७१२, ७२०, ७१७, ६७३ (एकूण ३५४६) कक्ष अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची सुधारित तात्पुरती सामाईक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- सहायक कक्ष अधिकारी, निवडश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील अनुक्रमे १, १ व २ अशा ४ कर्मचाऱ्यांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- उपसचिव संवर्गातील ४ अधिकाऱ्यांना सहसचिव पदी, अवर सचिव संवर्गातील ७ अधिकाऱ्यांना उपसचिव पदी, कक्ष संवर्गातील ६ अधिकाऱ्यांना अवर सचिव पदी पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत.
- उपसचिव संवर्गातील ५ अधिकाऱ्यांना अवर सचिव पदी पदावनत करण्यात आले आहे.
- एका अवर सचिवाला पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर करण्यात आला आहे. अवर सचिव व कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे २ व २०९ अशा २११ अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे नियमित दिनांक देण्यात आले आहेत.

**(ड) <u>बदल्या / पदस्थापना</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील २० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. सहसचिव, उपसचिव, अवर सचिव या गट-अ संवर्गातील अनुक्रमे २, ५, १२ अशा १९ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. कक्ष अधिकारी (राजपत्रित) व सहायक कक्ष अधिकारी (अराजपत्रित) संवर्गातील अनुक्रमे १०१ व १६७ अशा २६८ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. वरिष्ठ स्वीय सहायक, निवडश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, लघुटंकलेखक या संवर्गातील अनुक्रमे ६, ५, ३२ व १३ अशा ५६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. लिपिक-टंकलेखक संवर्गातील १०५ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- वरिष्ठ स्वीय सहायक, निवडश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील अनुक्रमे ५, १ व ६ अशा १२ कर्मचाऱ्यांची बदली रद्द करण्यात आली आहे.
- २ कक्ष अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आली आहे. १ सहसचिव व १ अवर सचिव अशा २ अधिकाऱ्यांना प्रत्यावर्तनानंतर बदलीने पदस्थापना देण्यात आली आहे.
- १ उपसचिव, २ अवर सचिव व ३ कक्ष अधिकारी अशा ६ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

***********